# ४. सहकारी संस्थेची स्थापना
(Formation of Co-operative Society)

४.१ प्रस्तावना
४.२ सहकारी संस्थेची स्थापना
४.२.१ प्रवर्तन अवस्था
४.२.२ सहकारी संस्थेची नोंदणी अवस्था
४.३ सहकारी संस्थेचा प्रवर्तक
४.३.१ प्रवर्तकाची कार्ये
४.४ सारांश
४.५ महत्वाच्या संज्ञा
४.६ स्वाध्याय

## ४.१ प्रस्तावना : (Introduction)

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशात सहकाराचा विकास मोठ्या प्रमाणावर झाल्याने विविध क्षेत्रात सहकारी संस्था स्थापन होऊ लागल्या. ग्रामीण तसेच शहरी भागातसुद्धा सहकाराचा विस्तार झाल्याचे दिसून येते. प्रारंभी फक्त शेती पतपुरवठा व त्यास पूरक सेवा या क्षेत्रापुरत्याच सहकारी संस्था स्थापन झालेल्या होत्या. अशा विविध प्रकारच्या संस्थांचे स्वरूप व कार्ये वेगवेगळी असतात. सहकारी संस्थांची स्थापना कोण आणि कशा पद्धतीने करतात यासाठी सहकारी संस्थेच्या नोंदणीची कार्यपद्धती समजावून घेणे महत्त्वाचे असते.

समान आर्थिक उद्दिष्ट्ये असणाऱ्या व्यक्ति आपल्या गरजा भागविण्यासाठी एकत्र येऊन सहकारी संस्थेची स्थापना करतात. यामुळे समाजातील सर्व स्तरातील लोकांना सहकारी संस्थेच्या स्थापनेची आवश्यकता भासते. सहकारी संस्थेची स्थापना ही एक कायदेशीर व तांत्रिक बाब आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० नुसार सहकारी संस्थेच्या नोंदणीची कार्यपद्धती निर्धारित केलेली आहे. त्यानुसार सहकारी संस्थेची नोंदणी करावी लागते. आपण या प्रकरणात सहकारी संस्थेची स्थापना, नोंदणीची कार्यपद्धती व प्रवर्तकाची कार्ये इत्यादीचा अभ्यास करणार आहोत.


## ४.२ सहकारी संस्थेची स्थापना : (Formation of Co-operative Society)

सहकारी संस्थेला कायदेशीर अस्तित्व प्राप्त होण्यासाठी तिची नोंदणी महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा **१९६०** नुसार होणे बंधनकारक आहे. सहकारी संस्थेची स्थापना ही प्रवर्तन अवस्था आणि नोंदणी अवस्था अशा दोन अवस्थांमधून होत असते.

### ४.२.१ प्रवर्तन अवस्था : (Promotion Stage)

''सहकारी संस्थेची स्थापना होण्यापूर्वी तिला ज्या ज्या टप्प्यातून जावे लागते त्यांना एकत्रितपणे 'प्रवर्तन अवस्था' असे म्हणतात''. संस्थेच्या नोंदणीपूर्वी विविध बाबी पूर्ण कराव्या लागतात.याचा प्रारंभ प्रवर्तन अवस्थेपासून होतो. सहकारी संस्था स्थापनेची कल्पना मनात उद्भवणे व ती संस्था प्रत्यक्षात साकार करणे याला प्रवर्तन अवस्था/नोंदणीपूर्व अवस्था असे म्हणतात. सहकारी संस्थेचा उद्देश निश्चित करून त्या उद्देशाप्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पूर्तता करावी लागते. प्रवर्तनातील सर्व टप्पे संस्थेच्या भावी काळाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असतात.

- **प्रवर्तन अवस्थेतील टप्पे**




- प्रवर्तन अवस्थेतील टप्पे पुढीलप्रमाणे –

१) **संस्था स्थापनेची कल्पना मनात उद्भवणे :** सहकारी संस्था स्थापन करण्याची कल्पना ज्या व्यक्ति व व्यक्तिसमूहाच्या मनात उद्भवते. अशा व्यक्ति किंवा व्यक्तिसमूहाला 'प्रवर्तक' म्हणतात. आपल्या परिसरातील दुर्बल घटकांच्या प्रगतीचा विचार करणाऱ्या आणि नेतृत्वाचे गुण असणाऱ्या व्यक्ति किंवा व्यक्तिसमूहाच्या मनात सहकारी संस्था स्थापनेची कल्पना उद्भवते.

२) **मनातील कल्पनेचे तपशीलवारपणे परीक्षण करणे :** नियोजित सहकारी संस्थेच्या कल्पनेचे परीक्षण करणे गरजेचे असते. सर्वप्रथम कल्पना वास्तवतेवर तपासून पाहिली पाहिजे. या परीक्षणातून नियोजित सहकारी संस्थेचे भांडवल उभारणीचे मार्ग, अर्थक्षमता याचा अंदाज घ्यावा लागतो. अर्थक्षम होऊ शकणाऱ्या सहकारी संस्थेची निबंधक नोंदणी करतात, अन्यथा अर्थक्षम होऊ न शकणाऱ्या संस्थेच्या नोंदणीस नकार देतात.

३) **अनौपचारिक सभेचे आयोजन करणे :** सहकारी संस्था स्थापनेची कल्पना मनात निश्चित केल्यानंतर प्रवर्तक परिसरातील लोकांना त्याला सुचलेली कल्पना पटवून देण्यासाठी अनौपचारिक सभेचे आयोजन करतात. त्या सभेत नियोजित सहकारी संस्थेची गरज व फायदे पटवून देतात.या सभेत संस्थेचे उद्देश, कार्यक्षेत्र, व्यवसायाचे स्वरूप, संस्थेचे प्रस्तावित नाव इत्यादी बाबी निश्चित करण्यात येतात.

४) **साधनसामग्री गोळा करणे :** सहकारी संस्था स्थापनेच्या कल्पनेस मूर्त स्वरूप देण्यासाठी साधनसामग्री प्रवर्तकाला गोळा करावी लागते.संस्थेच्या स्थापनेसाठी जागा, फर्निचर, स्टेशनरी, विहित नमुन्यातील अर्ज, वेगवेगळ्या कुटुंबातील किमान दहा सभासद इत्यादींची पूर्तता प्रवर्तक करतो. याशिवाय संस्थेच्या नोंदणीसाठी नोंदणी अधिकाऱ्याकडे विहीत नमुना 'अ' नुसार अर्ज सादर करावा लागतो.तसेच साधनसामग्री गोळा करण्याचा खर्च प्रवर्तकच करीत असतो.

५) **आर्थिक योजना तयार करणे :** सहकारी संस्थेला आपली नियोजित उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी भांडवलाची गरज असते. सहकारी संस्थेचा आकार व प्रकारानुसार भांडवलाची गरज भागवावी लागते. त्यासाठी भांडवल उभारणीचे मार्ग निश्चित करावे लागतात. यासाठी भागविक्री, ठेवी, सहकारी बँका व वित्तीय संस्था यांच्याकडून कर्जाच्या रूपाने उभारले जाणारे भांडवल इत्यादी आर्थिक स्वरूपाची माहिती देणारी योजना प्रवर्तक तयार करून योजनेची माहिती इतर सभासदांना देतात.

६) **दस्तऐवज व कागदपत्रे तयार करणे :** सहकारी संस्थेच्या नोंदणीसाठी किमान दहा सभासदांच्या सह्या असलेला पूर्ण व व्यवस्थितपणे भरलेला अर्ज नमुना 'अ' मध्ये तयार करतात. तसेच सभासद यादी, संस्थेचे पोटनियम, नोंदणीपूर्व झालेल्या सभेचे इतिवृत, जागा/इमारत मालकाचे नाहरकत प्रमाणपत्र, सभेस हजर असलेल्या सभासदांची नावे व सहयांचे पत्रक इत्यादी कागदपत्रे तयार करावी लागतात. अशा प्रकारे नियोजित सहकारी संस्थेच्या स्थापनेतील प्रवर्तन अवस्था पूर्ण होऊन संस्थेची नोंदणी अवस्था सुरू होते.

### ४.२.२ सहकारी संस्थेची नोंदणी अवस्था : (Registration Stage)

प्रवर्तन अवस्था पूर्ण झाल्यावर नोंदणी अवस्था सुरू होते. सहकारी संस्थेला कायदेशीर अस्तित्व प्राप्त होण्यासाठी तिची नोंदणी होणे गरजेचे असून या अवस्थेतील सर्व बाबी औपचारिक स्वरूपाच्या असतात. या बाबी पूर्ण केल्यानंतरच सहकारी संस्थेची नोंदणी होऊ शकते. त्यासाठी नोंदणी अवस्था महत्त्वाची असते. या अवस्थेमध्ये पुढील टप्प्यांचा समावेश होतो.

**• नोंदणी अवस्थेतील बाबी/टप्पे**

१) प्राथमिक/औपचारिक सभा बोलविणे
२) नियोजित सहकारी संस्थेचे बँकेत खाते उघडणे
३) नोंदणी प्रस्ताव सादर करणे
४) नोंदणी शुल्क / चलन पावती
५) नोंदणी अर्जाची नोंद
६) निबंधकामार्फत नोंदणी अर्जाची छाननी
७) सहकारी संस्था नोंदणी आणि वर्गीकरण
८) नोंदणी प्रमाणपत्र

१) **प्राथमिक /औपचारिक सभा बोलविणे :** नियोजित संस्थेची नोंदणीपूर्व तयारी करून प्रवर्तक सभासदांची प्राथमिक सभा बोलवितात. त्या सभेत नियोजित संस्थेचा उद्देश, व्याप्ती, सभासद संख्येची मर्यादा, कार्यक्षेत्र, भांडवल उभारणी, उपविधी, नियोजित संस्थेचे नांव, निवडणूक नियम, इत्यादीबाबत निर्णय घेतले जातात. तसेच या सभेच्या कामकाजाच्या इतिवृत्ताची एक प्रत नोंदणी अर्जासोबत जोडावी लागते.

२) **नियोजित सहकारी संस्थेचे बँकेत खाते उघडणे :** नियोजित सहकारी संस्था स्थापनेचा निर्णय प्राथमिक सभेत मंजूर झाल्यानंतर जिल्हा उपनिबंधकाच्या परवानगीने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत संस्थेचे खाते उघडले जाते. त्या खात्यावर सभासदांकडून मिळालेली भाग भांडवलाची रक्कम जमा केली जाते. भाग भांडवलापोटी संस्थेच्या नावे किती रक्कम जमा झाली आहे. यासाठीचा बँक शिलकीचा दाखला प्रवर्तकाला बँकेकडून मिळवावा लागतो व तो नोंदणी अर्जासोबत जोडावा लागतो .

३) **नोंदणी प्रस्ताव सादर करणे :** सहकार कायद्यातील तरतुदीनुसार नियोजित संस्थेच्या नोंदणीसाठी विहित नमुना 'अ' मध्ये नोंदणी अधिकाऱ्याकडे नोंदणी अर्ज चार प्रतीत प्रर्वतक सादर करतो. नोंदणी अर्जासोबत विविध प्रकारची कागदपत्रे सादर करावी लागतात. यामध्ये सभासद यादी, तलाठ्याचा दाखला, उपविधी चार प्रती, बँक शिलकीचा दाखला, जागेचे नाहरकत प्रमाणपत्र, प्राथमिक सभेचे इतिवृत्त, प्रकल्प अहवाल, नियोजित संस्थेचे नाव पत्ता, उद्‌दिष्टे, कार्यक्षेत्र, व्यवसायाचे स्वरूप इत्यादीचा समावेश असतो.

४) **नोंदणी शुल्क/ चलन पावती :** महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६१ नुसार सहकारी संस्थेचे नोंदणी शुल्क शासकीय कोषागारात भरावे लागते. त्यावेळी मिळणारी मूळ चलन पावती नोंदणी अर्जासोबत सादर करावी लागते. सहकारी संस्थेच्या नोंदणीसाठी रू. ५० ते रू. २५,००० पर्यंत शुल्क आकारले जाते. सहकारी संस्थांच्या प्रकारानुसार वेगवेगळे नोंदणी शुल्क आकारले जाते.

५) **नोंदणी अर्जाची नोंद :** सहकारी संस्थेची नोंदणी करण्यासाठी आलेला अर्ज मिळाल्यानंतर निबंधक नमुना 'ब' नोंदवहीत अर्जातील तपशिलाची नोंद करतात. अशा अर्जास अनुक्रमांक दिला जातो. अर्ज मिळाल्याबद्‌दलची पोच पावती मुख्य प्रवर्तकाकडे दिली जाते.

६) **निबंधकामार्फत नोंदणी अर्जाची छाननी :** नियोजित सहकारी संस्थेचा नोंदणी प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर नोंदणी अर्जाची व त्या सोबतच्या कागदपत्रांची छाननी निबंधक करतात. त्यात त्रुटी असतील तर त्या प्रवर्तकाला कळवून पूर्ण करण्याबद्‌दल कळविले जाते.छाननीच्या वेळी काही त्रुटी उद्‌भवल्यास त्या विषयीचा खुलासा करण्याचा निर्देश मुख्य प्रवर्तकास दिला जातो.

७) **सहकारी संस्था नोंदणी आणि वर्गीकरण :** नोंदणी अर्ज व कागदपत्रे परिपूर्ण असतील तर निबंधक त्या संस्थेची नोंदणी झाल्याचे शासकीय अधिपत्रात जाहीर करतात. त्या संस्थेचे योग्य त्या वर्गात/ उपवर्गात वर्गीकरण करतात. नोंदणीसाठी अर्ज दाखल झाल्यानंतर नोंदणीबाबतचा निर्णय नोंदणी अधिकाऱ्यांना दोन महिन्याच्या आत द्यावा लागतो. त्यांना नोंदणी नाकारायची असेल तर नोंदणी अधिकाऱ्यांनी मुख्य प्रवर्तकाला योग्य त्या कारणासह लेखी स्वरूपात कळविणे आवश्यक असते.

८) **नोंदणी प्रमाणपत्र :** सहकारी संस्थेची नोंदणी केल्यानंतर निबंधक संस्थेला नोंदणी क्रमांक देतो. संस्थेची नोंदणी झाल्याचा पुरावा म्हणून संस्थेला नोंदणी दाखला/नोंदणी प्रमाणपत्र दिले जाते. हे प्रमाणपत्र दिल्यानंतर संस्थेला कायदेशीर दर्जा प्राप्त होतो व संस्था अस्तित्वात येते. नोंदणी प्रमाणपत्रावर नोंदणीकृत संस्थेचे नाव, नोंदणी क्रमांक, नोंदणी दिनांक, वर्ष, वर्ग इत्यादीची माहिती असते. नोंदणी प्रमाणपत्रावर निबंधकाची सही व शिक्का असतो.तसेच नोंदणीनंतर संस्थेच्या नावात, उपविधीत निबंधकाच्या परवानगीशिवाय बदल करता येत नाही.

- **सहकारी संस्था नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे**

सहकारी संस्थेच्या नोंदणीसाठी मुख्य प्रवर्तक खालील कागदपत्रे तयार करतो.

१) **सभासद यादी :** नियोजित सहकारी संस्थेचे सभासद होणाऱ्या व्यक्तिंना सहकारी संस्थेकडे अर्ज करावा लागतो. त्यांना प्रवेश शुल्क व भागभांडवलाची रक्कम भरावी लागते. अशा सभासदांची यादी तयार केली जाते. या सभासद यादीच्या चार प्रती नोंदणी अर्जासोबत जोडाव्या लागतात. या यादीमध्ये सभासदाचे संपूर्ण नाव, वय, पत्ता, व्यवसाय, भागसंख्या व प्रवेश शुल्क इत्यादींचा समावेश असतो.

२) **तलाठ्याचा दाखला :** नियोजित सहकारी संस्थेच्या स्थापनेसाठी वेगवेगळ्या कुटुंबातील दहा व्यक्ति असाव्या लागतात. या व्यक्ति एकाच कुटुंबातील नाहीत असा दाखला तलाठ्याकडून मिळवून नोंदणी अर्जासोबत जोडावा लागतो.

३) **संस्थेचे उपविधी / पोटनियम :** सहकारी संस्थेचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० व नियम १९६१ मधील तरतुदीनुसार चालते. उपविधी म्हणजे संस्थेचे अंतर्गत कामकाज व व्यवस्थापन चालविण्यासाठी तयार केलेल्या नियमांचा संच होय. हे उपविधी मुख्य प्रवर्तक तयार करतो. उपविधी म्हणजे एकप्रकारे संस्थेची घटनाच असते. नोंदणी अर्जासोबत उपविधीच्या चार प्रती जोडाव्या लागतात. निबंधकाच्या परवानगीशिवाय उपविधीमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येत नाही.

४) **बँक शिलकीचा दाखला :** नियोजित सहकारी संस्थेचे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत मुख्य प्रवर्तकाच्या नावे खाते उघडले जाते. या खात्यावर भागभांडवलाची रक्कम व प्रवेश शुल्काची रक्कम जमा केली जाते. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून बँक शिलकीचा दाखला मिळवावा लागतो. हा दाखला नोंदणी अर्जासोबत जोडावा लागतो.

५) **जागेचे ना हरकत प्रमाणपत्र :** नोंदणी अर्जामध्ये नियोजित सहकारी संस्थेच्या कार्यालयाचा पत्ता लिहावा लागतो. संस्थेच्या कार्यालयासाठी ज्या व्यक्तिच्या मालकीची जागा आहे त्या जागा मालकाकडून 'ना-हरकत प्रमाणपत्र' घेणे आवश्यक असते. हे प्रमाणपत्र नोंदणी अर्जासोबत जोडावे लागते.

६) **औपचारिक सभेचे इतिवृत्त :** नियोजित सहकारी संस्थेच्या नोंदणी अर्जासोबत नोंदणीपूर्व घेतलेल्या प्राथमिक सभेच्या इतिवृत्ताची प्रत जोडणे आवश्यक असते.

७) **प्रकल्प अहवाल :** प्रकल्प अहवाल म्हणजे संस्थेच्या भविष्यकालीन प्रगतीचा आराखडा होय. या अहवालामध्ये उत्पन्नाचे मार्ग, उत्पादन खर्च, खरेदी विक्रीची व्यवस्था, संभाव्य नफा, अर्थक्षमता इत्यादी बाबींचा विचार करून संस्था नोंदणीस निबंधक परवानगी देतात.



**कृती–**

**१) नजीकच्या निबंधक कार्यालयाला भेट देऊन सहकारी संस्थेच्या नोंदणीबाबत माहिती जमा करा.**

## ४.३ सहकारी संस्थेचा प्रवर्तक : (Promoter)

सहकारी संस्थेच्या स्थापनेमध्ये प्रवर्तक हा अत्यंत महत्वाची भूमिका पार पाडतो. प्रवर्तक म्हणजे अशी व्यक्ति की, जी सहकारी संस्थेच्या स्थापनेसाठी पुढाकार घेते. प्रवर्तक हा सहकारी संस्था स्थापनेची कल्पना मनात आणण्यापासून ती कल्पना प्रत्यक्षात साकार करण्यासाठी आवश्यक ते सर्व परिश्रम घेतो.


**अर्थ –** 'प्रवर्तक' या संज्ञेची व्याख्या सहकार कायदयामध्ये दिलेली नाही.परंतु त्याची कार्ये स्पष्टपणे सांगितली आहेत. त्या आधारे प्रवर्तकाचा अर्थ पुढीलप्रमाणे सांगता येईल.

"सहकारी संस्थेच्या स्थापनेच्या कल्पनेपासून ती कल्पना मूर्त स्वरूपात आणून संस्थेची नोंदणी करून तिचा कारभार सुरळीत चालू करण्याच्या दृष्टीने सर्व कार्ये करणाऱ्या एका किंवा अनेक व्यक्तिंच्या समूहाला 'प्रवर्तक' म्हणतात."

प्रवर्तक हा सहकारी संस्थेच्या स्थापनेबाबत पुढाकार घेऊन संभाव्य सभासदांना गोळा करण्याची व साधनसामग्रीची

जुळवाजुळव करण्याचीही जबाबदारी स्वीकारतो. त्यासाठी त्याच्या अंगी नेतृत्व गुण, चिकाटी, पुढाकार वृत्ती, कर्तबगारी, कल्पकता इ. गुण असले पाहिजेत. तसेच संस्थेच्या स्थापनेसाठी कराव्या लागणाऱ्या प्रारंभिक खर्चाचा आर्थिक भारही पेलण्याची तयारी असावी लागते.

### ४.३.१ प्रवर्तकाची कार्ये: (Functions of Promoter)




१) **सहकारी संस्थेच्या स्थापनेची कल्पना सुचणे :** समाजाच्या /व्यक्ति समूहाच्या विशिष्ट समान गरजा भागविण्यासाठी एखादी सहकारी संस्था स्थापन करण्याची कल्पना मनात आणण्याचे महत्त्वाचे काम प्रवर्तकाला करावे लागते.

२) **अनौपचारिक सभा बोलविणे :** आपल्या मनातील सहकारी संस्था स्थापनेच्या कल्पनेला मूर्त स्वरूप देण्यासाठी प्रवर्तक गावातील किंवा परिसरातील संभाव्य सभासदांची सभा बोलवितो. तिला अनौपचारिक सभा किंवा नोंदणीपूर्व सभा असे म्हणतात. प्रवर्तक सहकारी संस्था स्थापन करण्याची कल्पना या सभेपुढे मांडतो व संस्था स्थापनेचे महत्त्व पटवून देतो.

३) **संस्थेची उद्दिष्टे ठरविणे :** अनौपचारिक सभेमध्ये संस्था स्थापनेचे महत्त्व पटल्यास संस्थेच्या उद्दिष्टांची एक यादी तयार करावी लागते.सहकारी संस्थेच्या प्रकारानुसार मुख्य उद्दिष्टात फरक पडतो. उदाहरणार्थः ग्राहक सहकारी संस्था स्थापन केली तर वाजवी किंमतीत जीवनावश्यक वस्तू व सेवांचा पुरवठा करून देणे हे संस्थेचे मुख्य उद्दिष्ट असेल.

४) **प्रकल्प अहवाल तयार करणे :** नियोजित सहकारी संस्थेचा संभाव्य व्यवहार, उत्पन्न-खर्च व उलाढाल विचारात घेऊन तिचा प्रकल्प अहवाल तज्ज्ञांकडून तयार करून घेण्याचे कार्य प्रवर्तकास करावे लागते.

५) **साधनसामग्री गोळा करणे :** नियोजित सहकारी संस्थेच्या स्थापनेसाठी आवश्यक असलेल्या साधनसामुग्रीचे संकलन प्रवर्तकाला करावे लागते. उदा. भांडवल गोळा करणे, संस्थेसाठी कार्यालयाची व्यवस्था करणे, फर्निचर, स्टेशनरी, लेखन साहित्य, मनुष्यबळ इत्यादींची जुळवाजुळव करणे.

६) **आर्थिक योजना तयार करणे :** नियोजित सहकारी संस्थेच्या प्रकल्प अहवालाच्या आधारे संस्थेची आर्थिक योजना तयार करून भांडवल उभारणीची साधने निश्चित करणे हे प्रवर्तकाचे काम आहे.

७) **बँकेत खाते उघडणे :** जिल्हा उपनिबंधकाच्या परवानगीने तो नियोजित सहकारी संस्थेचे खाते जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत उघडतो. संभाव्य सभासदांकडून भाग भांडवलापोटी जमा झालेल्या रकमेचा भरणा या खात्यात करून बँकेकडून शिलकीचे प्रमाणपत्र प्रवर्तकाला प्राप्त करावे लागते.

८) **नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे तयार करणे :** नियोजित सहकारी संस्थेच्या नोंदणीसाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे तयार करण्याचे कार्य प्रवर्तकांना करावे लागते. उदा. संस्थेची उपविधी, निवडणूकीचे नियम, सभासदांची नावे पत्यासह यादी, प्रवर्तक मंडळातील सभासदांची यादी, तलाठ्याचा दाखला, कार्यक्षेत्रातील लोकसंख्येचा दाखला, अनौपचारिक सभेचे इतिवृत्त, जागा/ घर मालकाचे 'ना हरकत प्रमाणपत्र' बँक शिलकी प्रमाणपत्र, प्रकल्प अहवाल इत्यादी कागदपत्रे त्याला तयार करावी लागतात .

९) **सभासदांची प्राथमिक/औपचारिक सभा बोलविणे :** सहकारी संस्था कायद्यानुसार नियोजित सहकारी संस्थेच्या संभाव्य सभासदांची प्राथमिक/औपचारिक सभा प्रवर्तक बोलवितो. या सभेत संस्था स्थापण्याचा ठराव मंजूर करून सभेचे इतिवृत्त नोंदणी अर्जासोबत जोडावे लागते.

१०) **नोंदणी अर्ज सादर करणे :** प्रवर्तकाला नियोजित सहकारी संस्थेच्या नोंदणीचा रितसर अर्ज नमुना 'अ' हा भरून आवश्यक त्या कागदपत्रासह नोंदणी अधिकाऱ्याकडे (निबंधक)सादर करावा लागतो. तसेच संस्था नोंदणीचे शुल्क शासकीय कोषागारात भरावे लागते.

११) **नोंदणी प्रमाणपत्र मिळविणे :** विहित नमुन्यातील नोंदणी अर्ज निबंधकाकडे सादर केल्यानंतर निबंधक त्या अर्जाची छाननी करतो. हा अर्ज परिपूर्ण असल्यास निबंधक अशा संस्थेची नोंदणी करतो व नोंदणीचे प्रमाणपत्र मुख्य प्रवर्तकाकडे देतो.

१२) **पहिली सर्वसाधारण सभा/नियामक सभा बोलविणे :** सहकारी संस्थेला नोंदणी प्रमाणपत्र मिळाल्यापासून तीन महिन्याच्या आत पहिली सर्वसाधारण सभा/नियामक सभा घेण्याचे काम मुख्य प्रवर्तकाला करावे लागते. सहकार कायद्यातील तरतुदीनुसार पहिली सर्वसाधारण सभा घेणे बंधनकारक असते. या सभेत हंगामी(पहिल्या) व्यवस्थापन समितीची निवड करणे, प्राथमिक खर्चास मंजुरी देणे, प्रवर्तकाच्या नावाने असणारे बँक खाते संस्थेच्या नावे करणे इत्यादीबाबत ठराव संमत केले जातात. ही सभा संस्थेच्या आयुष्यात एकदाच बोलविली जाते.

१३) **पहिल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त लिहिणे :** पहिल्या सर्वसाधारण सभेचे कामकाज संपल्यापासून एक महिन्याच्या आत त्या सभेचे इतिवृत्त प्रवर्तकाने लिहिणे आवश्यक असते. इतिवृत्त म्हणजे सभेतील कामकाजाच्या लेखी स्वरूपातील नोंदी होय. इतिवृत्तातील नोंदीचा धोरणे ठरविण्यासाठी उपयोग होतो.

अशा प्रकारे प्रवर्तक सहकारी संस्थेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची व्यक्ति असून संस्थेच्या स्थापनेपासून तिचे कार्य व्यवस्थितपणे सुरू व्हावे यासाठी ती प्रयत्नशील व जागरूक असते. सहकारी संस्थेचे यश प्रवर्तकाच्या भूमिकेवर अवलंबून असते.



**कृती–**

**२) सहकारी संस्थेच्या एखाद्या प्रवर्तकाची भेट घेऊन सहकारी संस्था स्थापन करताना येणाऱ्या अडचणीवर चर्चा करा.**

**फरक :–**

**प्रवर्तन अवस्था व नोंदणी अवस्था**

| अ. क्र. | मुद्दे | प्रवर्तन अवस्था | नोंदणी अवस्था |
|---|---|---|---|
| १. | अर्थ | सहकारी संस्था स्थापन होण्यापूर्वी तिला ज्या ज्या टप्प्यांतून जावे लागते त्यांना एकत्रितपणे 'प्रवर्तन अवस्था' म्हणतात. | नियोजित सहकारी संस्थेची स्थापना करण्यासाठी ज्या ज्या कृती कराव्या लागतात. त्यांना एकत्रितपणे 'नोंदणी अवस्था' म्हणतात. |
| २. | कायद्यातील तरतुदी | सहकारी कायद्यामध्ये प्रवर्तनाबाबतच्या तरतुदी दिलेल्या नाहीत. | सहकारी कायद्यामध्ये सहकारी संस्थेच्या नोंदणी अवस्थेच्या कायदेशीर तरतुदी दिल्या आहेत. |
| ३. | स्वरूप | प्रवर्तन अवस्थेतील सर्व बाबींचे स्वरूप अनौपचारिक असते. | नोंदणी अवस्थेतील सर्व बाबींचे स्वरूप औपचारिक असते. |
| ४. | टप्पे | प्रवर्तन अवस्थेमध्ये –<br>१) संस्था स्थापनेची कल्पना मनात उद्‌भवणे.<br>२) कल्पनेचे परिक्षण करणे.<br>३) अनौपचारिक सभेचे आयोजन करणे<br>४) साधनसामग्री गोळा करणे<br>५) आर्थिक योजना तयार करणे.<br>६) दस्तऐवज व कागदपत्रे गोळा करणे या टप्प्यांचा समावेश होतो. | नोंदणी अवस्थेमध्ये –<br>१) औपचारिक सभा बोलविणे.<br>२) नियोजित संस्थेचे बँकेत खाते उघडणे.<br>३) नोंदणी प्रस्ताव सादर करणे<br>४) नोंदणी शुल्क भरणे.<br>५) नोंदणी अर्जाची नोंद<br>६) नोंदणी अर्जाची छाननी.<br>७) नोंदणी व वर्गीकरण.<br>८) नोंदणी दाखला<br>या टप्प्यांचा समावेश होतो. |
| ५. | कालावधी | प्रवर्तनाच्या अवस्थेला विशिष्ट कालमर्यादा नसते. तरी पण नियोजित सहकारी संस्था स्थापन होण्यासाठी प्रवर्तक वेगाने हालचाली करतो. | नोंदणी अर्ज मिळाल्यापासून संस्थेची नोंदणी करणे किंवा नाकारणे ही कृती निबंधकाने दोन महिन्याच्या आत करणे कायद्याने बंधनकारक असते. |
| ६. | अस्तित्व | प्रवर्तन अवस्थेत सहकारी संस्थेला कायदेशीर अस्तित्व प्राप्त होत नाही. | नोंदणी अवस्थेनंतर सहकारी संस्थेला कायदेशीर अस्तित्व प्राप्त होते. |

## ४.४ सारांश

सहकारी संस्थेची स्थापना ही एक कायदेशीर व तांत्रिक बाब आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० मध्ये सहकारी संस्थेच्या नोंदणीची कार्यपद्धती निर्धारित केलेली आहे.

**सहकारी संस्था स्थापनेच्या अवस्था**

**प्रवर्तन अवस्था –**

१) संस्था स्थापनेची कल्पना मनात उद्‌भवणे
२) मनातील कल्पनेचे तपशीलवारपणे परीक्षण करणे
३) अनौपचारिक सभेचे आयोजन करणे
४) साधनसामुग्री गोळा करणे
५) आर्थिक योजना तयार करणे
६) दस्तऐवज व कागदपत्रे तयार करणे

**नोंदणी अवस्था :**

१) प्राथमिक/औपचारिक सभा बोलविणे
२) नियोजीत सहकारी संस्थेचे बँकेत खाते उघडणे
३) नोंदणी प्रस्ताव सादर करणे
४) नोंदणी शुल्क / चलन पावती
५) नोंदणी अर्जाची नोंद
६) निबंधकामार्फत नोंदणी अर्जाची छाननी
७) सहकारी संस्था नोंदणी आणि वर्गीकरण
८) नोंदणी प्रमाणपत्र

**सहकारी संस्था नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे :**

१) सभासद यादी
२) तलाठ्याचा दाखला
३) संस्थेचे उपविधी/पोटनियम
४) बँक शिलकीचा दाखला
५) जागेचे नाहरकत प्रमाणपत्र
६) औपचारिक सभेचे इतिवृत्त
७) प्रकल्प अहवाल

### प्रवर्तक :

"सहकारी संस्थेच्या स्थापनेच्या कल्पनेपासून ती कल्पना मूर्त स्वरूपात आणून संस्थेची नोंदणी करून तिचा कारभार सुरळीत चालू करण्याच्या दृष्टीने सर्व कार्ये करणाऱ्या एका किंवा अनेक व्यक्तिच्या समूहाला 'प्रवर्तक' म्हणतात".

### प्रवर्तकाची कार्ये :

१. सहकारी संस्था स्थापनेची कल्पना सुचणे
२. अनौपचारिक सभा बोलविणे
३. संस्थेची उद्दिष्टे ठरविणे
४. प्रकल्प अहवाल तयार करणे
५ साधनसामग्री गोळा करणे
६ आर्थिक योजना तयार करणे
७. बँकेत खाते उघडणे
८. नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे तयार करणे
९. सभासदांची औपचारिक सभा बोलवणे
१०. नोंदणी अर्ज सादर करणे
११. नोंदणी प्रमाणपत्र मिळविणे
१२. पहिली सर्वसाधारण सभा बोलविणे
१३. पहिल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त लिहिणे

## ४.५ महत्वाच्या संज्ञा

१) **उपविधी /पोटनियम –** सहकारी संस्थेच्या दैनंदिन कामकाजाचे नियम .

२) **अनौपचारिक सभा –** प्रवर्तन अवस्थेमध्ये आयोजित केलेली सभा.

३) **नमुना 'अ' –** सहकारी संस्थेचा नोंदणीच्या अर्जाचा नमुना

४) **इतिवृत्त –** सभेतील कामकाजाच्या लेखी स्वरूपातील नोंदी.

५) **निंबधक (नोंदणी अधिकारी) –** सहकारी संस्थेची नोंदणी व नियंत्रण करण्यासाठी राज्य शासनाने नियुक्त केलेला अधिकारी.

६) **नमुना 'ब' –** निबंधक नोंदणी अर्जाची नोंद आपल्या कार्यालयातील नमुना 'ब' या नोंदवहीत करतात.

## ४.६ स्वाध्याय

**प्र.१ अ) खाली दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व पुन्हा लिहा .**

१) सहकारी संस्थेची नोंदणी ही ----- असते .

अ) बंधनकारक ब) ऐच्छिक क) अनावश्यक

२) नोंदणी अर्जासोबत उपविधीच्या ----- -प्रती जोडाव्या लागतात.

अ) तीन ब) चार क) दोन

३) सहकारी संस्था स्थापनेची कल्पना ज्या व्यक्तिच्या मनात उद्‌भवते तिला ----- असे म्हणतात.
अ) निबंधक ब) भागीदार क) प्रवर्तक

४) सहकारी संस्थेचा नोंदणी अर्ज नमुना ----- मध्ये असावा लागतो.
अ) ‘क’ ब) ‘अ’ क) ‘ब’

५) सहकारी संस्थेच्या नोंदणीचा पुरावा म्हणून निबंधक संस्थेला ----- देतात.
अ) नोंदणी प्रमाणपत्र ब) सूचना पत्र क) इतिवृत्त

६) निबंधक नोंदणी अर्जाची नोंद आपल्या कार्यालयातील नमुना ----- या नोंदवहीत करतात.
अ) ‘ब’ ब) ‘क’ क) ‘अ’

## ब) योग्य जोडया जुळवा

| ‘अ’ गट | ‘ब’ गट |
|---|---|
| अ) नोंदणीचा पुरावा | १) १९६० |
| ब) प्रवर्तन अवस्था | २) नमुना’ ब’ |
| क) महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था कायदा | ३) नोंदणी दाखला |
| ड) नोंदणी अर्ज | ४) १९०४ |
| इ) सहकारी संस्थेचा नोंदणी अधिकारी | ५) नोंदणीपूर्व अवस्था |
| | ६) तलाठ्याचा दाखला |
| | ७) नोंदणी नंतरची अवस्था |
| | ८) नमुना ‘अ’ |
| | ९) निबंधक |
| | १०) सभासद |

## क) खालील विधानांसाठी एक शब्द /शब्दसमूह लिहा.

१) सहकारी संस्था स्थापन करण्यासाठी पुढाकार घेणारी व्यक्ति
२) सहकारी संस्था नोंदणीचा अर्ज
३) सहकारी संस्थेची नोंदणी करणारा अधिकारी
४) सभेतील कामकाजाची लेखी स्वरूपातील नोंद
५) सहकारी संस्थेच्या नोंदणीचा पुरावा
६) नोंदणी अर्जाची नोंद निबंधक या नोंद वहीत करतात.

## ड) खालील विधाने चूक की बरोबर ते सांगा.

१) प्रवर्तक सहकारी संस्थेच्या स्थापनेत पुढाकार घेत नाही.
२) सहकारी संस्थेच्या नोंदणीसाठी उपविधी आवश्यक असते.
३) पहिली सर्वसाधारण सभा नोंदणी पूर्व घ्यावी लागते .

४) सहकारी संस्थेच्या स्थापनेत प्रर्वतन अवस्थेला फारसे महत्त्व नसते.
५) नोंदणीचे प्रमाणपत्र हे सहकारी संस्थेच्या नोंदणीचा पुरावा असतो.
६) सहकारी संस्थेची नोंदणी करणाऱ्या अधिकाऱ्याला निबंधक असे म्हणतात.

## इ) खालील विधाने पूर्ण करा.

१) सहकारी संस्थेची नोंदणी ही ............ असते.
२) सहकारी संस्थेच्या स्थापनेत पुढाकार घेणाऱ्या व्यक्तिला ......... असे म्हणतात.
३) नोंदणी अर्जासोबत पोटनियमाच्या ............ प्रती जोडाव्या लागतात.
४) सहकारी संस्थेच्या नोंदणी अर्जाचा नमुना .......... मध्ये असावा लागतो.

## (फ) अचूक पर्याय निवडा.

| | |
|---|---|
| १) नोंदणी प्रमाणपत्र | |
| २) | प्रवर्तक |
| ३) ना हरकत प्रमाणपत्र | |
| ४) संस्थेची घटना | |
| ५) | नमुना 'अ' |

संस्था स्थापनेत पुढाकार, जागेच्या मालकाचा दाखला, नोंदणीचा पुरावा, नोंदणी अर्ज, उपाध्यक्ष, उपविधी

## ग) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) प्रवर्तन अवस्था म्हणजे काय?
२) संस्था नोंदणीपूर्वीच्या अवस्थेला कोणती अवस्था म्हणतात?
३) इतिवृत्त म्हणजे काय?
४) नियोजित सहकारी संस्थेचे खाते कोणत्या बँकेत उघडावे लागते?
५) प्रकल्प अहवाल म्हणजे काय?
६) उपविधी म्हणजे काय?

## ह) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा.

१) नोंदणी अर्ज नमुना 'क' मध्ये असावा लागतो.
२) सहकारी संस्थेची नोंदणी संचालक करतात.
३) सहकारी संस्था स्थापनेची कल्पना ज्या व्यक्तिच्या मनात येते तिला सचिव म्हणतात.
४) नोंदणी अर्जाची नोंद निंबधक नमुना 'अ' नोंदवहीत करतात.

**ई) गटात न बसणारा शब्द शोधा.**

१) अ) प्रवर्तक　ब) सभासद
　क) संचालक　ड) तलाठी

२) अ) प्रकल्प अहवाल　ब) प्राथमिक सभेचे इतिवृत्त
　क) उपविधी　ड) भाग प्रमाणपत्र

३) अ) साधनसामुग्री गोळा करणे　ब) संस्था स्थापनेची कल्पना सुचणे
　क) अनौपचारिक सभेचे आयोजन　ड) अंतिम सभेचे आयोजन

**ज) योग्य क्रम लावा.**

१) अ) पहिली सर्वसाधारण सभा　ब) प्रवर्तन अवस्था　क) नोंदणी अवस्था

२) अ) नमुना 'ब'　ब) नमुना 'अ'　क) नोंदणी प्रमाणपत्र

**प्र.२ खालील संज्ञा स्पष्ट करा.**

१) प्रवर्तक　२) उपविधी　३) नोंदणी प्रमाणपत्र　४) इतिवृत्त

**प्र.३ स्वमत लिहा./ उपयोजनावर आधारित प्रश्न.**

१) "सहकारी संस्था स्थापन करण्यासाठी विविध बाबींची पूर्तता करावी लागते'' या बाबत आपले मत व्यक्त करा.

२) सहकारी संस्थेच्या प्रवर्तकाला संस्था नोंदणीसाठी कागदपत्रे जमा करणे आवश्यक आहे. याबाबत आपले मत लिहा.

**प्र.४ फरक स्पष्ट करा.**

१) प्रवर्तन अवस्था व नोंदणी अवस्था

**प्र.५ टीपा लिहा.**

१) प्रवर्तन अवस्था　२) नोंदणी अवस्था　३) प्रवर्तकाची कार्ये

**प्र.६ कारणे द्या.**

१) पहिली सर्वसाधारण सभा सहकारी संस्थेच्या नोंदणीनंतर घ्यावी लागते.

२) नोंदणी दाखला हा सहकारी संस्थेच्या नोंदणीचा पुरावा असतो.

३) प्रवर्तक सहकारी संस्थेची स्थापना करतो.

**प्र.७ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) प्रवर्तकाची कार्ये स्पष्ट करा.

२) सहकारी संस्थेची नोंदणी अवस्था स्पष्ट करा.

**प्र.८ दीर्घोत्तरी प्रश्न**

१) प्रवर्तन म्हणजे काय ? सहकारी संस्थेच्या प्रवर्तन अवस्थेतील टप्पे स्पष्ट करा.

२) प्रवर्तकाची व्याख्या सांगून प्रवर्तकाला कोणकोणती कार्ये करावी लागतात ते स्पष्ट करा.

३) नोंदणी अवस्था म्हणजे काय ? नोंदणी अवस्थेतील विविध टप्पे स्पष्ट करा.